क्रमांक : २३४५६/मविस/क-२ (संगणक)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०९ डिसेंबर, २०२४

::परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी विधानभवन, नागपूर येथे सुरु होणार असून अधिवेशनाकरीता आवश्यक असणारी संगणकीय सामुग्री नागपूर येथून उपलब्ध होणार असल्याने अधिवेशनाकरीता लागणारा महत्वाचा विदा (डेटा) कॉपी करुन नागपूर येथे घेऊन जावे लागणार आहे व याकरीता संगणक कक्षामार्फत सर्व कक्षांचा विदा (डेटा) एकत्रीतपणे संगणक नियंत्रण कक्षातील एका संगणकावर कॉपी करणे आवश्यक आहे.

संगणक नियंत्रण कक्षातील संगणकावर **विदा (डेटा) कॉपी करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील :-**

- महत्वाचा विदा (डेटा) नागपूर येथे नेण्याकरीता संगणक कक्षातील एका संगणकावर विदा (डेटा) कॉपी करणे आवश्यक राहील. विदा (डेटा) व्यवस्थितरित्या कॉपी करण्याची जबाबदारी संबंधित कक्ष अधिकारी / कक्षात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची राहील.
- विदा (डेटा) कॉपी करण्याची अंतिम मुदत या सचिवालयाचे कामकाज मुंबई येथे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत राहील. त्यानंतरही जर कक्षांमार्फत विदा (डेटा) कॉपी करावयाचा राहून गेल्यास विदा (डेटा) नागपूर येथे आणण्याची व्यवस्था संबंधित कक्षांनी करावी.
- या प्रक्रीयेमध्ये फक्त अधिवेशनाकरीता लागणारा विदा (डेटा) कॉपी करावयाचा असल्याने महत्वाच्या विदा (डेटा) व्यतिरिक्त अन्य कोणताही विदा (डेटा) उदा. गाणी, गेम्स, फोटो इ. कॉपी करु नयेत, असे आढळून आल्यास उक्त बाब संबंधित कक्षाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत मा. सचिव (१) (कार्यभार) यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
- सर्व कक्षांनी महत्वाचा विदा (डेटा) नेटवर्कींगच्या माध्यमातून कॉपी करावयाचा असून याकरीता खाली नमूद संगणकात आपल्या कक्षाच्या नावाच्या फोल्डरमध्ये व्यवस्थितरित्या तसेच लक्षात राहील अशा स्वरुपात कॉपी करुन घ्यावा.
- संगणक नियंत्रण कक्षातील **MLS_NGPBKP_NAS** ह्या संगणकात प्रत्येक कक्षाच्या नावे फोल्डर असून त्यात आपला विदा (डेटा) नेटवर्कींगच्या माध्यमातून कॉपी करुन घ्यावा.
- तसेच या सचिवालयाच्या संकेतस्थळावर याबाबतची लिंक देण्यात आली आहे (**https://mls-ngpbkp-nas**).
- Username आणि Password करीता संगणक कक्षाशी संपर्क साधावा.
- प्रतिवेदन कक्षाबाबत ही जबाबदारी प्रत्येक प्रतिवेदकाची असेल.
- अधिकाऱ्यांच्या वापरातील संगणकाबाबत ही जबाबदारी स्वतः त्यांची आणि त्यांच्या स्विय सहाय्यकाची राहील.
- मा.पिठासीन अधिकारी यांची कार्यालये/विरोधी पक्ष नेता (महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा) यांच्या कार्यालयाच्या वापरात असलेल्या संगणकातील विदा (डेटा) बाबतची जबाबदारी त्यांच्या कार्यालयाची असेल.
- सर्व कक्षांनी त्यांचा विदा (डेटा) व्यवस्थित कॉपी करुन घेतला आहे किंवा कसे याची खात्री संबंधित अधिकाऱ्यांनी करुन घेणे आवश्यक राहील.
- उपरोक्त दर्शविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- **विदा (डेटा) कॉपी करण्याची कार्यवाही अधिवेशन संपल्यावर नागपूर येथून मुंबई येथे परत येते वेळी सुद्धा अवलंबविण्यात यावी.**

(शिवदर्शन साठये)
सह सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :-

(१) मा.पिठासीन अधिकारी /मा. उप पीठासीन अधिकारी आणि विरोधी पक्ष नेता यांची कार्यालये
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.